.nagpur

# NMC e NEWS LETTER

फेब्रुवारी २०१८

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## मनपाद्वारे एकलव्य पुरस्कारप्राप्त दिव्यांग खेळाडूंचा सत्कार

नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाद्वारे एकलव्य राज्य क्रिडा पुरस्कार प्राप्त खेळाडूंचा सत्कार मंगळवारी (ता.२०) ला क्रीडा समिती सभापती नागेश सहारे यांच्या हस्ते करण्यात आला.प्रतिभा कृष्णराव बोंडे, कमलेश गुणवंतराव लांजेवार (दोघेही पॉवरलिफ्टिंग) हे खेळाडूंचे नाव असून यांना १७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल सी.विद्यासागर राव आणि क्रीडा व सास्कृंतिक मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते एकलव्य राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कारप्राप्त खेळाडूंचे नागेश सहारे यांनी अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

# 'युथ एम्पॉवरमेंट समीट'

## तरुणाई व उद्योगांदरम्यानचा सेतू : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### युथ एम्पॉवरमेंट समीटचा समारोप, मनपातर्फे ७० दिव्यांगांना ई–रिक्षांचे वाटप



नागपूर : आज तरूणाईसमोर बेरोजगारी ही सर्वात मोठी समस्या आहे. तर दुसरीकडे उद्योगांना कुशल मनुष्यबळ मिळत नाहीये. फॉर्च्यून फाऊंडेशनद्वारे आयोजित युथ एम्पॉवरमेंट समीट हा या दोघांमधला सेतू असल्याचे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.नागपूर महानगरपालिका समाजकल्याण विभाग, फॉर्च्यून फाऊंडेशन, जिल्हाधिकारी कार्यालय, आणि इंजिनियरिंग कॉलेज प्लेसमेंट असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युथ एम्पावरमेंट समीटचा समारोप शनिवार, २४ फेब्रुवारीला डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाला मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नंदा जिचकार, फॉर्च्यून फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. आ. अनिल सोले, आ. सुधाकरराव देशमुख, आ. मल्लीकार्जुन रेड्डी, आ. नागो गाणार आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'मॅग्रेटिक महाराष्ट्र'च्या माध्यमातून १६ लाख करोड रुपयांची गुंतवणूक होणार असून त्याद्वारे तब्बल ३५ लाख लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे. 'मेक इन इंडिया'च्या माध्यमातून आठ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक येणार होती. त्यापैकी आतापर्यंत सव्वापाच लाख करोड रुपयांचे करार करण्यात आल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. जागतिक अर्थव्यवस्थेत मंदी असताना भारतीय अर्थव्यवस्था सात टक्के दराने वाढत आहे, असे सांगत त्यांनी जीडीपी हे आकडे नसून आर्थिक विकास व जीडीपीत वाढ आवश्यक असल्याचे मतही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. जगामध्ये बंदर असलेल्या शहरांचा चांगला विकास झाला आहे. मात्र, जेथे बंदर नाही, त्यांचा विकास करावयाचा असेल तर त्यांना बंदरांशी जोडणे आवश्यक आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शहरे जेएनपीटीशी जोडत असून त्यामुळे भौगोलिक परिस्थितीचा उद्योगांच्या उभारणीवर परिणाम होणार नाही. महाराष्ट्रात कुठेही उद्योग उभारता येतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. तत्पूर्वी आ. अनिल सोले यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून दोन दिवसात २५ हजार युवकांनी युथ एम्पॉवरमेंट समिटमध्ये नोंदणी केल्याची माहिती दिली. शिवाय दोन दिवसात तीन हजाराहून अधिक विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट झाले असून ५०० हून अधिक मुद्रा योजनेंतर्गत निवडण्यात आले आहेत, अशी माहितीही दिली. कार्यक्रमाचे संचालन रेणुका देशकर यांनी केले. प्रा. कुणाल पडोळे यांनी आभार व्यक्त केले.

## थोडक्यात



### 'विशेष बालकां'सह महापौरांचा असाही 'व्हॅलेंटाईन डे'

नागपूर : 'प्रेम म्हणजे प्रेम असतं. तुमचं आमचं सेम असतं', या प्रेम काव्याच्या ओळी खूप काही सांगून जातात. व्हॅलेंटाईन डे अर्थात प्रेम दिवस. हा दिवस प्रत्येक जण आपआपल्या परीने साजरा करीत असतो. महापौर नंदा जिचकार यांनी आजचा दिवस असाच 'विशेष बालकां'सोबत घालवून नवा आदर्श घालून दिला. कीर्तिमान स्थापित करण्यासाठी सामूहिक झुंबा डान्स करणाऱ्या 'विशेष बालकां'ना गुलाब फूल देऊन त्यांच्याप्रति आपली कृतज्ञता व्यक्त केली. निमित्त होते रोटरी क्लब ऑफ नागपूर आणि लता मंगेशकर हॉस्पीटलतर्फे आयोजित कार्यक्रमाचे. मानकापूर येथील इनडोअर विभागीय क्रीडा संकुलामध्ये विक्रमासाठी सुमारे ६०० विशेष मुलांच्या एक तास झुंबा डान्सचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महापौर नंदा जिचकार यांना आमंत्रित करण्यात आले होते. सुमारे ६०० मुले एकत्र येऊन विक्रमाला गवसणी घालणार, ह्या विचाराने सारेच उत्साहित होते. विक्रमासाठी झुंबा डान्सला सुरुवात झाली. आता नॉन स्टॉप एक तास विद्यार्थ्यांनी डान्स करून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. महापौर नंदा जिचकार यांनी न राहवून मंचावरून उतरून सरळ मुलांना गाठले. गळाभेट घेत प्रातिनिधिक स्वरूपात काही मुलांना गुलाबपुष्प भेट दिले. त्यांचे तोंडभरून कौतुक केले. महापौरांनी केलेल्या या कौतुकाने विद्यार्थीही भारावून गेले. उत्साह वाढवून प्रोत्साहन दिल्याबद्दल चिमुकल्यांनीही महापौरांचे आभार मानले. हा सोहळा, आजचा व्हॅलेंटाईन डे कायमचा लक्षात राहील, असे गौरवोद्गार महापौर नंदा जिचकार यांनी काढले.

### चिल्ड्रेन ट्राफिक पार्कचा वर्धापन दिन सोहळा

### सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

नागपूर : ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार चिल्ड्रेन ट्राफिक पार्कच्या नवव्या वर्धापन दिनानिमित्त मंगळवारी (ता. २७) आयोजित चित्रकला स्पर्धेत पहिली ते चवथीच्या गटात बिशप कॉटनची विद्यार्थिनी गार्गी सिंग, पाचवी ते सहावीच्या गटात वाल्मिकीनगर हिंदी शाळेची विद्यार्थिनी गुंज़न शर्मा, तर आठवी ते नववीच्या गटात लालबहादूर शास्त्री विद्यालयाचा अनिकेत बारई यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.पहिल्या गटात द्वितीय क्रमांक भारत प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी खुशबू क्षिरसागर, तृतीय क्रमांक सरस्वती विद्यालयाचा केविन थॉमसने पटकाविला. लिटल स्टारचा विद्यार्थी वेयन सातपुते, सांदीपनीचा श्रीराम यादव यांनी उत्तेजनार्थ पुरस्कार पटकाविला. दुसऱ्या गटात द्वितीय वाल्मिकीनगर हिंदी हायस्कूलची मयुरी निशाद तर तृतीय बॅ. शेषराव वानखेडे विद्यानिकेतनची श्रावणी शेराम, उत्तेजनार्थ सुरेंद्रगढ शाळेची पोर्णिमा द्विवेदी आणि हडसची विद्यार्थिनी भूमी जोशी हिने प्राप्त केला. तिसऱ्या गटात द्वितीय क्रमांक वाल्मिकीनगर हिंदी स्कूलची कीर्ति शर्मा, तृतीय दत्तात्रय नगर शाळेचा विद्यार्थी अभिषेक अंकुश तर उत्तेजनार्थ पुरस्कार सुरेंद्रगढ हायस्कूलचा आशीष उपाध्याय, आझाद नगर उर्दू शाळेचा विद्यार्थी नाहीद परवीन ह्याने पटकाविला. सर्व विजेत्यांना ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार चिल्ड्रेन ट्राफिक पार्कमध्ये सायंकाळी आयोजित रंगारंग कार्यक्रमादरम्यान बक्षिसे देण्यात आली.

## यूएस कॉन्सल जनरलची मनपाला भेट

### महापौर आणि आयुक्तांनी दिली स्मार्ट सिटी प्रकल्पांची माहिती

नागपूर : पश्चिम भारताचे यूएस कॉन्सल जनरल एडगर्ड डी. कागन आणि गेटकेचे क्रान्तेझेन यांनी सोमवारी (ता. २६) नागपूर महानगरपालिकेला भेट दिली. या भेटीत त्यांनी महापौर नंदा जिचकार, आयुक्त अश्विन मुदगल आणि स्मार्ट अॅण्ड सस्टेनेबल सिटी कॉर्पोरेशनचे सीईओ डॉ. रामनाथ सोनवणे यांच्याकडून स्मार्ट सिटी अंतर्गत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती जाणून घेतली. नागपूर शहरात सुरू असलेल्या प्रकल्पांना दोन्ही बाजूंच्या सहकार्याने कशी गती देता येईल, याची शक्यता पडताळण्याकरिता त्यांनी ही भेट दिली.महापौर नंदा जिचकार आणि आयुक्त अश्विन मुदगल यांनी यावेळी यूएस कॉन्सल जनरल यांना स्मार्ट अॅण्ड सेफ सिटी प्रकल्प, क्षेत्राधिष्ठित शाश्वत विकास (-Area Based Development), सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्प (STP), रोड नेटवर्क प्रोजेक्ट आणि २४ बाय ७ पाणी पुरवठा योजना आदी नागपुरात सुरू असलेल्या प्रकल्पांची माहिती दिली. पूर्ण झालेले आणि सध्या प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पांचीही माहिती दिली. यूएस कॉन्सल जनरल एडगर्ड डी. कागन हे नागपुरात सुरू असलेल्या प्रकल्पाची माहिती जाणून प्रभावित झाले. याबद्दल महाराष्ट्र शासन आणि स्थानिक नेत्यांचे अभिनंदन केले. नागपुरात सुरू असलेल्या विकास कार्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी देत असलेल्या योगदानाचा विशेषत्वाने त्यांनी उल्लेख केला.

## महिला उद्योजिका मेळाव्याचे थाटात उद्घाटन

नागपूर : नागपूर शहरात उत्तम उद्याने, खेळ मैदाने, स्मशानभूमी आणि बाजार तयार व्हावे हे आपले स्वप्न आहे. महानगरपालिकेच्या मालकीच्या बाजारांच्या जागेवर लवकरच सर्व सोयींनीयुक्त अत्याधुनिक बाजार तयार होतील, त्याची प्रक्रिया सुरू आहे. या बाजारांमध्ये महिला बचतगटांच्या सुमारे २५० दुकाने महापौरांनी उपलब्ध करून द्यावेत. यासाठी आवश्यक ते सहकार्य आम्ही करू असे प्रतिपादन केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केले.नागपूर महानगरपालिका, महिला व बालकल्याण समिती, समाजकल्याण विभाग, दीनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय उपजिविका अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने रेशीमबाग मैदानावर आयोजित महिला उद्योजिका मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महापौर नंदा जिचकार होत्या. विशेष अतिथी म्हणून खासदार रूपा गांगुली उपस्थित होत्या. व्यासपीठावर पश्चिम नागपूरचे आमदार सुधाकर देशमुख, दक्षिण नागपूरचे आमदार सुधाकर कोहळे, स्थायी समिती सभापती संदीप जाधव, आयुक्त अश्विन मुदगल, महिला व बालकल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे प्रामुख्याने उपस्थित होते.

पुढे बोलताना ना.नितीन गडकरी म्हणाले, महिला बचत गटांच्या उत्पादनांना मार्केट मिळवून देण्याच्या दृष्टीने असे कार्यक्रम उपयुक्त ठरतात. उद्योगासाठी प्रेरणा देतात. या क्षेत्रात काम करताना महिलांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. चांगले काम, खरे बोलणे आणि उत्पादनाची गुणवत्ता हे कुठल्याही व्यवसायासाठी आवश्यक असतात, असे म्हणत त्यांनी मेळाव्यासाठी आयोजक आणि सहभागी बचतगटांच्या शुभेच्छा दिल्या.

खासदार रूपा गांगुली म्हणाल्या, महिला आणि नागरिकांना सामाजिक सन्मान मिळायलाच हवा. घरोघरी शौचालय बांधण्याचा विचार पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मांडला. त्याला मूर्तस्वरूप दिले आणि पहिल्यांदा महिलांना सामाजिक सन्मान प्राप्त झाला. उद्योग क्षेत्रातच नव्हेतर आता प्रत्येक क्षेत्रात महिला अग्रेसर होत आहेत. ही समाजासाठी अभिमानाची बाब आहे. नागपूर शहरात नितीन गडकरी यांच्यासारखे भातृतुल्य नेतृत्व लाभणे हा नागपूरचा सन्मान आहे, या शब्दात त्यांनी गडकरी यांचा गौरव केला.

अध्यक्षस्थानावरून बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, महिला उद्योजिका राष्ट्रनिर्माणासाठी मदत करते. घरात जर उद्योजिका असली तर घरातील बालकांवर आपसूकच चांगले संस्कार घडतात. नागपूर महानगरपालिकेने आयोजित केलेले त्या मेळाव्यासाठी सात दिवस पुरेसे नाही. महिला बचत गटांच्या महिलांना प्रशिक्षण मिळावे यासाठी कायमस्वरूपी प्रशिक्षण केंद्र आणि बाजरपेठ मिळावे यासाठी कायमस्वरूपी बाजार व्हावा, यासाठी आमचे प्रयत्न आहे आणि त्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. यासाठी राज्य शासनाची मदत घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविकातून महिला व बालकल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे यांनी मेळाव्याच्या आयोजनामागची भूमिका विशद केली.

## महापौर चषक स्पर्धेतून आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तयार व्हावे हीच अपेक्षा : पालकमंत्री

### राष्ट्रीय सायकलपोलो स्पर्धेचे उद्घाटन

नागपूर : 'महापौर चषक' अंतर्गत विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन महानगरपालिकेद्वारे होत आहे. अशा प्रकारच्या स्पर्धेतून आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तयार व्हावे हीच अपेक्षा आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. नागपूर महानगरपालिका, ऑल महाराष्ट्र सायकल पोलो असोसिएशन आणि सायकल पोलो फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३४ व्या सब ज्युनिअर (मुले), ३८ व्या ज्युनिअर (मुले), ४० व्या सिनीअर (पुरूष) राष्ट्रीय स्तरावरील सायकल पोलो स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. स्पर्धा २ ते ४ फेब्रुवारी दरम्यान कस्तुरचंद पार्क येथे आयोजित करण्यात आली आहे. यावेळी व्यासपीठावर पश्चिम नागपूरचे आमदार सुधाकर देशमुख, नागपूरच्या महापौर नंदाताई जिचकार, स्थायी समिती सभापती संदीप जाधव, क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, उपसभापती प्रमोद तभाने, धरमपेठ झोनच्या सभापती रूपा राय, हनुमाननगर झोनचे सभापती भगवान मेंढे, मंगळवारी झोनच्या सभापती सुषमा चौधरी प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलताना पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, अशा प्रकारच्या स्पर्धेमुळे खेळाडू तयार होत असतात. महानगरपालिकेने अशा प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन केले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. महापौर चषकांतर्गत अशाच स्पर्धा कायम स्वरूपी सुरू राहू द्याव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महापौर नंदा जिचकार यांनी या स्पर्धेच्या आयोजनासाठी सर्व आयोजकांचे आभार मानले. कार्यक्रमाची सुरूवात झेंडावंदनाने झाली. प्रारंभी राष्ट्रगीत झाले. त्यानंतर आमदार सुधाकर देशमुख आणि महापौर नंदा जिचकार यांना खेळाडूंनी आपला परिचय दिला. सुधाकर देशमुख यांनी सायकलवर स्वार होऊन किक मारून सामन्याचा शुभारंभ केला. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ रविवार दिनांक ४ फेब्रुवारी रोजी सायं ६ वाजता होणार असल्याची माहिती क्रीडा समिती सभापती नागेश सहारे यांनी दिली.

# थोडक्यात...

## दीनदयालनगरमध्ये पहिल्या ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राचे भूमिपूजन

### महापौर निधीतून दहाही झोन मध्ये प्रस्तावित

नागपूर : ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा म्हणून विविध सोयी-सुविधा असलेले ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र दहाही झोनमध्ये प्रत्येकी एक करण्याचे प्रस्तावित आहे. महापौर नंदा जिचकार यांच्या संकल्पनेतून साकारणार असलेल्या पहिल्यावहिल्या केंद्राच्या बांधकामाचे भूमिपूजन लक्ष्मीनगर झोनअंतर्गत येणाऱ्या दीनदयाल नगर येथील आजी-आजोबा उद्यानात महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते पार पडले.यावेळी मनपाचे शिक्षण सभापती प्रा. दिलीप दिवे, क्रीडा समितीचे उपसभापती प्रमोद तभाने, नगरसेविका सोनाली कडू, प्रा. राजीव हडप उपस्थित होते. ज्येष्ठ विरंगुळा केंद्र प्रस्तावित असलेल्या जागेवर महापौर नंदा जिचकार यांनी भूमिपूजन केले. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, आजी-आजोबा उद्यान हे दीनदयाल नगर परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत उपयोगाचे आहे. परिसरातील शेकडो नागरिक या उद्यानात येत असतात. या उद्यानात यापूर्वी ग्रीन जीम लावण्यात आली आहे. कंपोस्ट खत प्रकल्पही या उद्यानात होत आहे. परिसरातील ज्येष्ठ नागरिकांची मागणी लक्षात घेऊन याच उद्यानाची निवड या भागातील नगरसेवकांनी केली. त्यानुसार आज केंद्राचे भूमिपूजन करताना अत्याधिक आनंद होतोय. या केंद्राचा उपयोग परिसरातील ज्येष्ठांनी आपले हक्काचे केंद्र म्हणून करावा. त्याची देखभाल योग्यप्रकारे करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

## मनपाद्वारे शिवाजी महाराजांना अभिवादन



नागपूर : मनपाद्वारे शिवाजी महाराजांना अभिवादननागपूर महानगरपालिकेच्यावतीने शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. महापौर नंदा जिचकार यांनी गांधी गेट महालस्थित शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून त्यांना अभिवादन केले. याप्रसंगी दक्षिण नागपूरचे आमदार सुधाकर कोहळे, उपमहापौर दीपराज पार्डीकर, माजी महापौर प्रवीण दटके प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी गांधीबाग झोन सभापती सुमेधा देशपांडे, नगरसेविका नेहा वाघमारे, श्रद्धा पाठक, हर्षदा साबळे, बंटी शेळके प्रामुख्याने उपस्थित होते. यानंतर महानगरपालिकेच्या मुख्यालयातील महापौर कक्षातही मान्यवरांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून त्यांना अभिवादन केले.

### शिवाजी नगर येथील सिंहासनारूढ पुतळ्याला माल्यार्पण

शिवाजी नगर येथील उद्यानात नव्याने बसविण्यात आलेल्या शिवाजी महाराजांच्या सिंहासनारूढ पुतळ्याला महापौर नंदा जिचकार यांनी माल्यार्पण करून अभिवादन केले.

## भंगारातील २३० बसेसचा होणार लिलाव

नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या शहर बस वाहतूक सेवेअंतर्गत वंश निमय लि.ने चालविलेल्या १० वर्षांपूर्वी आलेल्या २३० स्टार बसेस सध्या भंगारात पडल्या आहेत. त्याची किंमत पुन्हा कमी होण्याच्या अगोदर त्याचा लिलाव करण्यात येईल, असा निर्णय नगरसेवक प्रवीण भिसीकर यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या परिवहन उपसमितीने घेतला.यासंदर्भात मंगळवारी (ता. २१) डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति सभागृहात बैठक पार पडली. बैठकीला उपसमितीचे अध्यक्ष प्रवीण भिसीकर, सदस्य अर्चना पाठक, नितीन साठवणे परिवहन विभागाचे वरिष्ठ व्यवस्थापक शिवाजी जगताप, परिवहन विभागाचे रवींद्र पागे, वंश निमयचे प्रतिनिधी अजिंक्य पारोळकर, श्री. अलोणे उपस्थित होते. बैठकीत उपसमितीने प्रारंभी भंगारात असलेल्या बसविषयी माहिती घेतली. २३० बसेस असून त्यापैकी १२४ ऑरेंज सिटी स्ट्रीट येथे तर १०६ बसेस टेका नाका येथे आहेत. या बसेचा कालावधी १० वर्षापेक्षा अधिक झाल्यामुळे त्या भंगार झाल्या आहेत. त्याची किंमत कमी होण्याअगोदर त्याचा लिलाव करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

## स्मार्ट सिटी घडविण्यात नागरिकांचे योगदान महत्त्वाचे : आयुक्त अश्विन मुदगल




नागपूर : नागपूर शहराचा 'स्मार्ट सिटी' प्रकल्पांतर्गत विकास करण्यासाठी निवड झाल्यानंतर पूर्व नागपुरातील भरतवाडा, पुनापूर, पारडी, भांडेवाडी अंतर्गत येणाऱ्या १७३० एकर क्षेत्रात नगर रचना परियोजना राबविण्याचे कार्य नागपूर स्मार्ट ण्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या माध्यमातून करण्यात येत आहे. यासाठी या संपूर्ण प्रकल्पात नागरिकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त अश्विन मुदगल यांनी केले.क्षेत्राधिष्ठीत नियोजनबद्ध व शाश्वत विकासासाठी निवड करण्यात आलेल्या भरतवाडा, पुनापूर, पारडी, भांडेवाडी येथे नगर रचना परियोजना राबविण्यात येत आहे. अहमदाबाद येथील एचसीपी कंपनीने सदर परियोजना तयार केली असून त्याबद्दल परिसरातील नागरिकांना माहिती देण्यासाठी पुनापूर येथील भवानी मंदिर सभागृहात नगर रचना परियोजनेतील प्रस्तावित तरतुदींबाबत जमीन मालकांसोबत विचार विनीमय सभेचे आयोजन गुरुवारी (ता. ८) करण्यात आले होते. या सभेत ते बोलत होते. यावेळी मंचावर पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, स्मार्ट ण्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे प्रामुख्याने उपस्थित होते.आयुक्त अश्विन मुदगल पुढे म्हणाले, शहराचा नियोजनबद्ध विकास नसल्यामुळे प्रत्येकाला अडचण सहन करावी लागते. नागरी सुविधांचा अभाव असतो. मग अशा शहराचा शाश्वत आणि नियोजनबद्ध विकास करायचा असेल तर लोकसहभाग महत्त्वाचा असतो. लोकांचा सहभाग, शासनाचा निधी आणि प्रशासनाचे कार्य यातून 'स्मार्ट सिटी' संकल्पना साकार होईल. यासाठी निवड करण्यात आलेल्या १७३० एकर जागेचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी नगर विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी नागरिकांच्या सूचना आमंत्रित असून आपल्या सहभागानेच या आराखड्याला अंतिम रूप द्यायचे आहे, असेही त्यांनी सांगितले. आमदार कृष्णा खोपडे यांनी पूर्व नागपुरात सुरू असलेल्या विकास कामांची माहिती आपल्या मार्गदर्शनातून दिली. ते म्हणाले, सध्या सर्वाधिक विकास कामे पूर्व नागपुरात सुरू आहे. सिम्बॉयसिस सारखे विद्यापीठ, आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल पूर्व नागपुरात येत आहे. उड्डाण पुलाची कामे प्रगतीपथावर आहेत. आता एरिया बेस्ड डेव्हलपमेंटच्या माध्यमातून भरतवाडा, पुनापूर, पारडी भागाचा नियोजनबद्ध विकास प्रस्तावित आहे. पुढील टप्प्यात वाठोडा, भांडेवाडी हे क्षेत्रही या प्रकल्पात आणण्याचा प्रयत्न करीत असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. लकडगंज झोनचे सभापती यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. पूर्व नागपूरमध्ये स्मार्ट सिटी अंतर्गत होत असलेल्या नियोजनबद्ध विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे त्यांनी आभार मानले. विकासाच्या प्रत्येक योजनेत या भागातील नागरिक सहकार्य करतील, असे आश्वासन दिले.

## मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांनी बघितला 'पॅडमॅन'

नागपूर : महिला आरोग्याशी संबंधित आणि सामाजिक संदेश देणारा अक्षयकुमार यांचा बहुचर्चित 'पॅडमॅन' चित्रपट शुक्रवारी (ता. ९) नागपुरात प्रसारित झाला. हा चित्रपट नागपूर महानगरपालिकेअंतर्गत असलेल्या शाळांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना लिबर्टी सिनेमागृहात दाखविण्यात आला. नागपूर महानरपालिका आणि जेसीआयच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चित्रपट सुरू होण्यापूर्वी आयोजित छोटेखानी कार्यक्रमात आमदार गिरिश व्यास आणि महापौर नंदा जिचकार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. महिलांच्या व्यथा, सामान्य स्त्रियांच्या व्यथा ह्या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांपुढे मांडण्यात आलेल्या आहेत. म्हणून हा चित्रपट विद्यार्थिनींना दाखविण्यात येत असल्याची माहिती या प्रकल्पाचे संचालक सनी फ्रांकोसिस यांनी दिली. मनपाच्या शाळेतील विद्यार्थी सामान्य वर्गातील, गरीब असल्यामुळे स्त्रियांविषयीच्या समस्यांबाबत ते जागृत नसतात. त्यांनी हा सिनेमा बघावा आणि आई-वडिलांनाही हा सिनेमा बघण्यास प्रवृत्त करायला हवे, असे आवाहन महापौर नंदा जिचकार यांनी केले. यावेळी मनपाच्या शाळेतील ३०० विद्यार्थ्यांनी या चित्रपटाचा आनंद घेतला. यावेळी आयोजकांच्या वतीने उपस्थित विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकीन वाटण्यात आले. मनपाच्या सर्व शाळेत सॅनिटरी नॅपकीन मशीन्स लावण्यात आलेल्या आहेत. पाच रूपयात सॅनिटरी नॅपकीन मनपाच्या शाळेत उपलब्ध करण्यात आले आहे. ८ ते १० शाळांमध्ये मशीन्स लावण्यात आलेले आहे. बाकी सर्व शाळांमध्ये लवकरच लावण्यात येईल, अशी ग्वाही महापौर नंदा जिचकार यांनी दिली.




## नागपूर मेट्रोच्या वर्धापन दिन सोहळ्यात मनपाच्या विद्यार्थ्यांचा सन्मान

नागपूर : महामेट्रोच्या नागपूर प्रकल्पाच्या तिस-या वर्धापन दिनानिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मनपाच्या सर्व शाळेतील विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. १४ व १५ फेब्रुवारी रोजी मनपाच्या शाळांमध्ये स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावणा-या विजेत्यांना सेंटर पॉईंट हॉटेल, रामदासपेठ येथे आयोजित नागपूर मेट्रोच्या वर्धापन दिन सोहळ्यात महापौर नंदा जिचकार व महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेत दिक्षीत यांच्या हस्ते सायकल देऊन गौरविण्यात आले तर तृतीय क्रमांक पटकावणा-या विजेत्यांना गिफ्ट व्हाऊचर देऊन सन्मानित करण्यात आले.निबंध स्पर्धेत सुरेंद्रगढ हायस्कूल येथील ९ व्या वर्गातील विद्यार्थिनी शामा मिश्रा प्रथम, विवेकानंद हिंदी विकास शाळेतील ९ व्या वर्गातील प्रियंका शुक्ला द्वितीय तर दुर्गानगर शाळेतील ९ व्या वर्गातील गौरी शेंडे हिने तृतीय क्रमांक पटकावला.

## नगर विकास प्रधान सचिवांनी घेतला स्वच्छता सर्वेक्षण तयारीचा आढावा

नागपूर : स्वच्छ सर्वेक्षण सुरू होत आहे. त्यासंबंधीच्या अंतिम आढावा घेण्यासाठी नगर विकास विभागाच्या प्रधान सचिव मनिषा म्हैसकर यांनी शुक्रवारी (ता.२३) ला नागपूर महानगरपालिका मुख्यालायाला भेट दिली. यावेळी महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, आयुक्त अश्विन मुदगल, वैद्यकीय सेवा व आरोग्य समिती सभापती मनोज चापले, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे प्रामुख्याने उपस्थित होते. केंद्र शासनाद्वारे देशातील सर्व शहरांमध्ये स्वच्छ सर्वेक्षण सुरू आहे. नागपुरात पुढील दोन दिवसात सर्वेक्षण सुरू होणार आहे. यासाठी मनपा प्रशासनाने केलेल्या तयारीचा आढावा नगर विकास विभागाच्या प्रधान सचिव मनिषा म्हैसकर यांनी घेतला. नागपूर शहराला मिळणाऱ्या गुणांची समीक्षा देखील यावेळी त्यांनी केली. नागरिकांमध्ये स्वच्छ सर्वेक्षणाबाबत जनजागृती होईल याकरिता शहरातील मुख्य ठिकाणी म्हणजे ज्या ठिकाणी वर्दळ असेल अशा ठिकाणी मोठे होर्डिंग्स लावण्यात यावे, असे सूचित केले. गणेशपेठ येथील बस स्थानकाजवळ आणि रेल्वे स्टेशनजवळ स्वच्छतेचा अभाव आहे. तेथे स्थानिक अधिकारी व कर्मचारी नेमून स्वच्छता करण्यात यावी, असे निर्देशित केले. कचरा विलगीकरणामध्ये सध्या नागपूर मागे आहे. त्याकडे बारकाईने लक्ष देण्याची गरज आहे. शहरात स्वच्छ सर्वेक्षण सुरू असल्याची जनजागृती जाहिरातीद्वारे, फेसबुक, ट्विटर, वॉटस पद्वारे करण्यात यावी, जेणेकरून नागरिक स्वच्छ सर्वेक्षणाकरिता जागृत राहतील, असेही सूचित केले. कचरा टाकण्याचा परिसराचे रंगरंगोटी करून सौंदर्यीकरण करण्यात यावे, असे आदेश त्यांनी दिले. यावेळी बोलताना महापौर म्हणाल्या, स्वच्छ सर्वेक्षणात लोकप्रतिनिधींचा सहभाग आवश्यक आहे. प्रत्येक नगरसेवकांनी आपल्या प्रभागात स्वच्छ सर्वेक्षणाबाबत जनजागृती करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मनपाचे पदाधिकारी व अधिकारी दिवसरात्र मेहनत घेत असल्याचे सांगत शुभेच्छाही दिल्या.

### स्वामी विवेकानंद स्मारकाला भेट

भेटी दरम्यान मनिषा म्हैसकर यांनी अंबाझरी उद्यानाजवळ मनापद्वारे उभारण्यात आलेल्या स्वामी विवेकानंद स्मारक तसेच धरमपेठ मधील म्हाडा कॉलनीजवळ रोटरी क्लबच्या साहाय्याने उभारण्यात आलेल्या सार्वजनिक महिला शौचालयाला भेट दिली. सीएसआर निधीतून उभारलेल्या या शौचालयाबाबत त्यांनी रोटरी क्लबचे आभार व्यक्त केले. त्यानंतर रामनगर हिलटॉप येथील सौंदर्यीकरण करण्यात आलेल्या कचरा संकलन स्थळालाही त्यांनी भेट दिली. या सर्व कार्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

## कस्तुरचंद पार्कच्या देखभाल दुरुस्तीसाठी 'मेट्रो' देणार मनपाला मोबदला

### हेरिटेज समितीने दिली प्रस्तावाला मान्यता : अंबाझरीजवळील मेट्रो बांधकामालाही दिली हिरवी झेंडी

नागपूर : कस्तुरचंद पार्क येथील ४०८.४५९ चौ.मी. जागा मेट्रो रेल स्टेशनला देताना मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने कस्तुरचंद पार्कची देखभाल दुरुस्ती करावी, अशी अट ठेवण्यात आली होती. मात्र, यासंदर्भात मेट्रो रेल कार्पोरेशन असमर्थ असून ती जबाबदारी नागपूर महानगरपालिकेने सांभाळावी. त्या मोबदल्यात त्याला लागणारा खर्च 'मेट्रो' मनपाला देईल, या 'मेट्रो'च्या प्रस्तावाला नागपूर हेरिटेज संवर्धन समितीने मंजुरी दिली. यासोबतच तेथे बनणाऱ्या मेट्रो स्टेशनच्या कस्तुरचंद पार्ककडील दर्शनी भागावर १५ मी लांबी आणि ६ मी. रुंदी असलेली प्रोजेक्शन स्क्रीन लावण्यात येणार असून त्यावर हेरिटेजबाबतची जनजागृती करण्यात येणार आहे.नागपूर हेरिटेज संवर्धन समितीच्या बैठकीचे आयोजन बुधवारी (ता. १४) छत्रपती शिवाजी महाराज नवीन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात करण्यात आले होते. सदर बैठकीत ही मान्यता देण्यात आली. बैठकीला समितीचे सदस्य तथा नीरीचे संचालक डॉ. तपन चक्रवर्ती, नागपूर विद्यापीठाच्या इतिहास विभागाच्या प्रपाठक डॉ. श्रीमती शुभा जोहरी, सहायक संचालक नगर रचना शाखा नागपूर सुप्रिया थूल, नगर रचना विभागाचे सहायक संचालक प्रमोद गावंडे, नागपूर सुधार प्रन्यासचे अधीक्षक अभियंता श्री. गुज्जलवार, वास्तुविशारद अशोक मोखा उपस्थित होते. मेट्रो रेलच्या अंबाझरी तलावालगतच्या बांधकामावर विधानपरिषदेचे आमदार प्रकाश गजभिये यांनी घेतलेल्या आक्षेपानंतर मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेडने सुरक्षिततेच्या बाबतीत तांत्रिक अहवाल व सुरक्षितता प्रमाणपत्र समितीला सादर केले. त्याचा अभ्यास करून समितीचे सदस्य स्ट्रक्चरल इंजिनिअर पी. एस. पाटणकर आणि वास्तुविशारद अशोक मोखा यांनी समितीला अहवाल सादर केला. त्यात काही अटी व शर्ती ठेवण्यात आल्या. त्याची पूर्तताही मेट्रो रेल कार्पोरेशनने केल्यामुळे नागपूर हेरिटेज संवर्धन समितीने सदर बांधकामालाही हिरवी झेंडी दाखविली आहे. हेरिटेज संवर्धन समितीने सुचविल्याप्रमाणे डीएसओ द्वारा निर्देशित शिफारशी व उपायांचे अनुपालन करण्यात येईल आणि जागेवरील बांधकामाचा तिमाही देखरेख अहवाल सादर करण्यात येईल, असे आश्वासन मेट्रो रेल कार्पोरेशनने समितीला दिले. नागपूर हेरिटेज संवर्धन समितीच्या बैठकीत एकूण नऊ विषय चर्चेला आले होते. त्यापैकी दोन विषय परवानगीसंदर्भातील होते. २० ऑगस्ट रोजी सद्भावना दिवसानिमित्त होणाऱ्या सद्भावना दौड आयोजनाच्या परवानगीसंदर्भात होता. ज्याला समितीने मंजुरी दिली. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती कार्यक्रम आयोजनालाही समितीने सशर्त परवानगी दिली.